# प्रकरण - 1

# प्रस्तावना

# माहितीचा अधिकाराचा कायदा, 2005

सार्वजनिक उपक्रमामध्ये पारदर्शकता व जबाबदारीच्या जाणिवांची चालना देण्यासाठी सार्वजनिक उपक्रमांतर्गातील नियमित संस्थेविषयी माहिती नागरिकांना मिळविण्यासाठी योग्य उपाय म्हणून हा कायदा आहे. केंद्रीय माहिती आणि राज्य माहिती आयुक्तांची स्थापना ह्या करिता संबंधित किंवा यांच्यासाठी स्थापन केल्या आहेत.

भारताच्या घटनेने लोकशाही राज्य पध्दतीची स्थापना केली आहे त्यामुळे लोकशाही कार्यरत राहण्यासाठी आणि भ्रष्टाचार निमूर्लन करण्यासाठी नागरिकांना माहिती देणे व माहितीमध्ये पारदर्शकता ठेवणे आवश्यक आहे. यासाठी शासन व त्यांच्या संस्थाना राज्य कारभारासाठी जबाबदार धरणे महत्वाचे ठरते.

जनतेचे हित व राज्यकारभार सक्षमतेने चालविण्यासाठी माहिती उघड करण्यामुळे प्रत्यक्षात संघर्ष होण्याची शक्यता आहे. यासाठी मर्यादित स्त्रोताचा जास्तीत जास्त उपयोग करून संवेदनशील माहितीची गुप्तता राखणे आवश्यक आहे.

लोकशाहीच्या प्रिय ध्येय धोरणांचे रक्षण करताना अशा विसंगत हितांमध्ये समोपचार आणणे गरजेचे आहे. त्यामुळे ज्या नागरिकांना अशा माहितीची आवश्यकता आहे त्यांना माहिती देणे गरजेचे ठरते.